# रोजगार हमी कामावरील मजुरांना धान्य वाटपाची नवी पद्धत
# मजुरांची फसवणूक व अन्याय

हायकोर्टातील केस लढण्यासाठी पैसे जमा करण्याच्या हेतूने छापलेली कूपने विकत घेऊन लोकांनी सहकार्य करावे, असे लेखक आवाहन करतात.


## मोहन हिराबाई हिरालाल


महाराष्ट्र शासनाने दि. १६ ऑगस्ट १९८२ पासून रो. ह. यो.वर करणाऱ्या श्रमिकांना पूर्वी देण्यात येणाऱ्या अर्धा किलो धान्या-ऐवजी एक किलो धान्य देण्यात येईल अशी घोषणा केली आहे. ही घोषणा म्हणजे श्रमिकांची चक्क फसवणूक असून शासन श्रमिकांची हेतुपूर्वक दिशाभूल करीत आहे असेच म्हणावे लागेल. निर्णय वरील शब्दांत असला तरी त्याला एक 'मात्र धान्य देताना ... दर्शविल्याप्रमाणे नवीन पद्धतीचा अवलंब करण्यात यावा' असे ... जोडलेले आहे आणि ही 'नवी पद्धत' म्हणजेच खरी ...ची मेख आहे.

'नवीन पद्धत' काय आहे ते समजून घेण्याअगोदर रो. ह. यो. वर ... रूपात मजुरीचा काय इतिहास आहे ते बघणे योग्य होईल ...च्या काळात मजुराने केलेल्या एकंदर कामाची मजुरी लक्षात ... त्या मजुरीतील प्रत्येक तीन रुपयांच्या हिश्श्याकरिता १ किलो ...चे कूपन देण्यात येत होते. त्याकरिता प्रति कूपन गव्हासाठी ... पैसे व तांदळासाठी ४० पैसे कापून घेण्यात येत म्हणजे मजुराला ... ३ रु. मजुरीमागे ४० पैशात १ किलो धान्य मिळत होते. ... वर्षी शासनाने ही पद्धत बंद करून पूर्ण दिवसाच्या कामा-...ता १ कूपन देण्याची नवीत पद्धत सुरू केली. कूपनवरील धान्य ...लो होते ते अर्धा किलो कमी करण्यात आले व १ किलो ...करिता पूर्वीच्या ३० पैशांऐवजी अर्धा किलो धान्याकरिता ६५ ...राने पैसे कापण्यात येऊ लागले. म्हणजे मजुराने ३ रु. पेक्षा कितीही ... काम केले तरी त्याला एक दिवसाकरिता फक्त अर्धा किलो ... व तेही १ रु. ३० पैसे किलोच्या दराने मिळत होते. कूपनवर ...णारे हे धान्य मजुराच्या रेशन कोटचातून कपात होई. या ...मुळे रो. ह. यो. वरील मजुरांचे मोठेच नुकसान झाले. पण हा ...ोष मजुरांचे अज्ञान व असंघटित स्थिती यांमुळे प्रगट होऊ शकला ... प्रातिनिधीक स्वरूपात परत पूर्वीप्रमाणेच ३ रु. मजुरीच्या ...वर १ किलोचे धान्य कूपन मिळाले पाहिजे अशी मागणी ... होत राहिली. आता शासनाने पुन्हा एकदा पद्धत बदलून अगदी ...नव पद्धतच ठरविली आहे. ह्या पद्धतीसंबंधीच्या शासनाच्या ...तील अंश असा : 'आतापर्यंत मजुरीपोटी धान्य देताना ...च्या मजुरीतून धान्याची किंमत वजा केली जात असे. आता ...रित आदेशानुसार श्रमिकांना त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ... मजुरी रोख स्वरूपात देण्यात यावी. तसेच श्रमिकांना धान्य उपलब्ध व्हावे म्हणून मजुरी देताना प्रत्येक दिवसाच्या कामासाठी श्रमिकाला एक किलो धान्याचे कूपन देण्यात यावे. मजुरी संपूर्ण देण्यात येणार असल्यामुळे आता धान्याची किंमत मजुरीतून वजा करण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. मात्र श्रमिकाला मिळालेली धान्य कूपने त्याने सध्याच्या पद्धतीनुसार स्वस्त धान्य दुकानदाराकडे हजर करून त्यापोटी त्याला लागणारे धान्य विकत घ्यावयाचे आहे. धान्य विकत घेताना स्वस्त धान्य दुकानदाराकडे जे धान्य शिल्लक असेल त्यावेळी कुठल्याही प्रकारचे धान्य उदा. ज्वारी, गहू, तांदुळ श्रमिकास खरेदी करता येईल मात्र सदर खरेदी करताना त्याला प्रत्येक किलोमागे किंमतीस २५ पैसे सूट म्हणून देण्यात येईल. ही सूट धान्य कूपनावर दिलेली असेल एक किलोच्या कूपनास २५ पैसे सूट, दोन किलोच्या कूपनास ५० पैसे सूट, तीन किलोवर ७५ पैसे सूट. पाच किलोवर १ रु. २५ सूट. इत्यादी प्रकारे कूपनांवर लिहिलेल्या धान्याच्या कोटचाप्रमाणे कमी पैसे देऊन श्रमिकांस स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरीदता येईल. म्हणजे मजुरी देताना श्रमिकास पूर्ण मजुरी द्यावयाची आहे परंतु त्यास धान्य निश्चित स्वरूपात मिळेल या उद्देशाने मजुरी देताना त्यास धान्याचे कूपनही द्यावयाचे आहे.

मजुरांना ज्या प्रकारचे धान्य ( उपलब्धतेवर अवलंबून ) हवे त्या प्रकारचे धान्य खरीदण्यास मोकळीक राहील. त्याचप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदाराकडे धान्य शिल्लक असताना श्रमिकांना प्राधान्यतेवर धान्य पुरवठा केला जाईल. शक्यतो कमी किंमत असलेले धान्य श्रमिकांना कूपनवर उपलब्ध करून देण्याचा अन्न व नागरी पुरवठा विभाग प्रयत्न करील. मात्र ही बाब सर्वस्वी धान्याचे उपलब्धतेवरच अवलंबून राहील.'

शासनाच्या या निर्णयाचा मसुदा अत्यंत चाणाक्षपणे तयार करण्यात आलेला आहे पूर्वीप्रमाणेच एक किलो धान्याचे कूपन मिळाले पाहिजे ही मजुरांची मागणी व त्या बाबतच्या त्यांच्या भावना ओळखून शासन जणू काही त्यांची मागणीच पूर्ण करत आहेत अशी दिशाभूल करणारी भाषा हे याचे दुसरे वैशिष्टच !

### शासनाने काय साधले आहे ?

नवीन पद्धतीचा अर्थ अगदी उघड आहे. तो म्हणजे मजुरीचा किमान भाग धान्य रूपात देण्याच्या जबाबदारीतून शासन हात

झटकून मोकळे झाले आहे. 'शिल्लक असेल तर' आणि 'उपलब्धतेवर अवलंबून' हे शब्द वापरून शासनाने जबाबदारी सरळ झुगारून दिली आहे. कूपनचे पैसे कापून न घेता शासन मजुराला संपूर्ण मजुरी नगदी स्वरूपातच देणार आहे. तसेच निश्चित धान्याचे कूपन न देता प्रती किलोमागे २५ पैसे फक्त सूट मिळवून देणारे कूपन देण्याची नवी पद्धत हे सुद्धा त्याचेच निदर्शक आहे.

### मजुरांना धान्य महाग पडणार

आपण एक उदाहरण घेऊ ते नवीन पद्धतीला लावून बघू. उदा- रोजगार हमी कामावरील एका मजुराने एका आठवड्यात ३३ रु. (तेहेतीस रुपये) मजुरीइतके काम केले तर त्याला वेगवेगळ्या पद्धतीप्रमाणे किती किलो धान्य व कोणत्या किंमतीला मिळेल ?

| पद्धत | एका आठवड्यात कमावलेली मजुरी | किती धान्य मिळेल किलो | पैसे कपात (तांदूळ) रु. पै. | मजुराला प्रती किलो धान्याकरीता द्यावी लागलेली किंमत (तांदूळ) |
|---|---|---|---|---|
| पूर्वीची जुनी | ३३ रु. | ८ किलो | ३–२० | ०–४० |
| गेल्या वर्षी | ३३ रु. | ३ किलो | ३–९० | १–३० |
| नवीन पद्धत | ३३ रु. | ६ किलो (उपलब्ध-तेवर अवलंबून) | — | २–१० (२५ पैसे सूट कमी करून) |

वरील तक्त्यावरून स्पष्ट आहे की, पूर्वीपेक्षा मजुरांना प्रती किलो धान्याकरिता (जर शिल्लक किंवा उपलब्ध असेल तर) जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. त्याशिवाय रेशन दुकानदाराची नगदी पैशाचा व्यवहार करावा लागणार असल्याने नवीनच कटकट त्यांच्या मागे लागणार आहे ती वेगळीच.

महाराष्ट्र शासनाने शेतमजुरांचे किमान वेतन ठरविण्याकरिता नेमलेल्या पागे समितीने अहवालात स्पष्टपणेच म्हटले आहे की, शेतमालकांनी मजुरांना दररोजच्या मजुरीचा किमान धान्य किंमतीइतका हिस्सा धान्य रूपाने दिलाच पाहिजे. ते करिता शासन जे म्हणते ते नियम बनविणाऱ्या शासनाला का काय ? महाराष्ट्र शासनाने स्वतःच बनविलेल्या नियमाला फासला आहे.

शासन स्वतःच्या बचावाकरिता आणखी एक पळवाट ठेवते. रोजगार हमी कायदा किंवा नियम यामध्ये कुठेही धान्य मजुरीचा काही हिस्सा द्यावा असे म्हटलेले नाही, ही गोष्ट असली तरी व्यवहारात प्रत्यक्षतः ही पद्धत रोजगार हमी योजना झाली होती व ती मजुरांच्या हिताची तसेच मानवी दृष्टि न्याय दृष्टीनेही योग्य होती; म्हणजे प्रत्यक्ष पुस्तकात नसले पद्धत कायद्याचा अलिखित भागच आहे असे मानले पाहिजे.

गेल्या वर्षीच केलेला बदल रद्द करून पूर्वीच्या जुन्या धान्य कूपन देण्यात यावेत अशी मागणी असताना ती पूर्ण कर राहो त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने शासनाने निर्णय घेतले. मजुरांच्या भावना माहिती असल्याने शाब्दिक चलाखी करून अगदी आम्ही मजुरांचीच मागणी पूर्ण करीत आहोत असा अत्यंत मजुरविरोधी निर्णय दडपून दिला आहे. शासनाने रोजगार हमी मजुरांची फसवणूक उघड करून या शेवटच्या टित मजुराला वेळीच सावध करावयास हवे.

या वर्षीची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता मजुरांना क इतकी आज धान्य रूपात मजुरीची आवश्यकता आहे हे लक्ष कमी किमतीत अधिक धान्य मजुरीचा हिस्सा म्हणून द्याय होते, पण पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या शासनाने या स्वातंत्र्य मुहूर्तावर मजुरांच्या तोंडचा घासच काढून घेऊन एक प्रकारे 'राहण्याच्या स्वातंत्र्याची'च भेट या शेवटच्या असंघटित दिली आहे. असेच म्हणावे लागेल.

संदर्भ महा. शासन नियोजन विभाग
शासन निर्णय क्र. इजीएस/एफएफडब्ल्यू १०८२/६५/का.
दिनांक १६ जुलै १९८२.

## श्री. प्र. वि. जठार यांचे दुर्दैवी निधन

पुण्याच्या स्टेट बँकेचे चीफ रीजनल मॅनेजर श्री प्रभाकर विष्णु जठार यांचे १० सप्टेंबर १९८२ रोजी चंदीगडजवळ टॅक्सीतून प्रवास करीत असता अपघाती निधन झाले. श्री जठार हे अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमधील सेवा-निवृत्त शिक्षक श्री बा. ना. जठार यांचे पुतणे. त्यांचे शिक्षण अमळनेरच्या प्रताप हायस्कूल-मधले तेथून मॅट्रिक झाल्यानंतरच ते नोकरीस लागले शिक्षण बेताचे; तरी अंगभूत हुषारी, कामावरील निष्ठा, प्रामाणिकपणा, स्वच्छ चारित्र्य, सौजन्यशीलता, विनम्रता व कार्य-क्षमता या गुणांमुळे त्यांना स्टेट बँकेत जबाब-दारीच्या व मानाच्या एकोपेक्षा एक श्रेष्ठ अशा जागा मिळत जाऊन ते चीफ मॅनेजरच्या पदा-पर्यंत वर चढत गेले. विद्यार्थीदशेत अमळनेरला कै. साने गुरुजींच्या सहवासात ते असत आणि सेवादलाच्या व राष्ट्रसेवेच्या इतर कार्यात सातत्याने भाग घेत. गरिबांना विविध प्रकारांनी आर्थिक साहाय्य करण्याच्या अनेक योजना आखून गरिबांचे कल्याण व्हावे म्हणून ते रात्रंदिवस झटून मनापासून काम करीत.

काश्मीरच्या सहलीला सपत्नीक परत येत असताना हा अकाली दुर्दैवी होऊन त्यात त्यांना जगाचा निरोप लागला. ही अत्यंत दुर्दैवी घटना त्यांच्या पत्नी मंगलाताई जबर दुखापत झाली असून त्या चंदी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. कुटुंबावर कोसळलेल्या या दुर्दैवी व त्यांच्या दुःखात साधना-परिवार आहे.